श्री:

# महाभरणीश्राद्धविचार:

पितृपक्षामध्ये ज्या दिवशी भरणीनक्षत्र येईल त्याला महाभरणी असे नाव असून त्या दिवशी पितृतृप्त्यर्थं महाभरणीश्राद्ध केले पाहिजे।

भरणी पितृपक्षे तु महती परिकीर्तिता।
अस्यां श्राद्धं कृतं येन स गयाश्राद्धकृद्भवेत्॥ (मत्स्यपुराण)

पितृपक्षात भरणीनक्षत्रावर श्राद्ध केले तर गयाक्षेत्रात श्राद्ध केल्याचे फल मिळते असे मत्स्यपुराणातील वाक्य निर्णयसिन्धूत उद्धृत केले आहे.

भरणीश्राद्धाविषयी निर्णयसिन्धुकारानी "भरण्यां श्राद्धमतिप्रशस्तम्" "भरणीनक्षत्रावर श्राद्धकरणे अतिप्रशस्त आहे" असे सांगितले आहेत. कारण या श्राद्धाने गयाश्राद्धफल मिळते. येथे अतिप्रशस्तशब्दाने अर्थवादसिद्ध होतो. अर्थवाद काम्य असल्याने नित्य होत नाही.

" वायुर्वै क्षेपिष्ठा देवता "

या वेदवाक्यामध्ये ज्यांना द्रव्याची अपेक्षा आहे त्यांनी वायवेष्टि करावी. असे सांगून वायु ही शीघ्रगामिनी देवता असून या इष्टिने यजमानाला शीघ्र द्रव्यप्राप्ति होईल. ही प्रशस्त आहे असा अर्थवाद आहे. ही इष्टि करायलाच पाहिजे असे नाही. द्रव्यापेक्षा असेल तर करणे असे मीमांसा शास्त्रात आहे. प्राशस्त्यात लक्षणा आहे.

या प्रमाणे भरणीश्राद्धाला गयाश्राद्धफलप्राप्तिरूप काम्यफल असल्याने हे श्राद्ध काम्य असून केले तर प्रशस्त असे प्राशस्त्यात लक्षणा दाखवायला निर्णयसिंधूत "भरणीश्राद्धमतिप्रशस्तम्" असे अर्थवाद रूपाने प्रतिपादन केले आहे.

हाच अभिप्राय मनात ठेवून धर्मसिन्धुकारानी " अपरपक्षात भरणीश्राद्ध केले तर गयाश्राद्धफल मिळते. ते श्राद्ध अपिण्डक व षड्दैवत करणे. काहीलोक वडील मेल्यानन्तर प्रथमवर्षातच भरणीश्राद्ध करतात. दुसऱ्या वर्षात करत नाही. याला

मूलवचन सापडत नाही. मृतव्यक्तीला वर्षानंतर पितृत्वप्राप्ति असल्याने दुसऱ्या वर्षापासून भरणीश्राद्ध करणे योग्य आहे. परम्परा आहे म्हणून करायचे असेल तर मृताचे एकच पार्वण उद्दिष्ट करून सदैव करणे असे सांगितले आहे.

काही लोक धर्मसिंधूतील "तत्र मूलं मृग्यम्" = या विषयात मूल सापडत नाही" हे वचन मनात ठेवून

भरण्यां प्रथमाब्दे तु क्रियाङ्गं श्राद्धमाचरेत् ।
पार्वणं पुत्रिणः प्रोक्तं एकोद्दिष्टमपुत्रिणः ॥
भरण्यामकृतं यस्य श्राद्धं चापरपाक्षिकम् ।
प्रेतत्वान्नैव मुक्तिः स्याद्दत्तैः श्राद्धशतैरपि
(श्राद्धकल्पलता - कृत्यसंग्रह)

ही वचने सांगतात. व्यक्ति मरण पावल्यानंतर प्रथम वर्षात प्रेतक्रियांग भरणीश्राद्ध केले पाहिजे. पित्याचे श्राद्ध असेल तर पार्वणविधि, अपुत्र पितृभिन्नादि असेल तर एकोद्दिष्टाने श्राद्ध करणे. पितृपक्षात भरणीश्राद्ध केले नाही तर शंभर श्राद्ध केले तरी प्रेतत्वापासून मुक्ति मिळणार नाही असा अर्थ आहे.

या श्लोकामध्ये "क्रियाङ्ग" असा शब्द वापरलेला आहे. क्रिया म्हणजे कोणती क्रिया? असा प्रश्न येतो. त्यासाठी वर्षांतसपिंडन पक्ष येथे आहे असे म्हटले तर प्रश्न सुटतो. कारण क्रिया म्हणजे प्रेतक्रिया. त्याचे अंग म्हणून भरणीश्राद्ध होतो. या पक्षामध्ये वर्षपर्यंत मासिकश्राद्ध होत असतात. पार्वण या शब्दाने द्वादशाह सपिंडनपक्ष स्वीकृत आहे. तरी वर्षांतसपिण्डनपक्षात एकोद्दिष्टविधीने, द्वादशाहसपिंडनपक्षात पार्वणविधीने भरणीश्राद्ध करणे असा अर्थ होतो. षोडशमासिकश्राद्धात भरणीश्राद्ध घटक होत नाही म्हणून या श्लोकातून अवर्जनीयता सिद्ध होत नाही. प्राशस्त्य असल्याने हे श्राद्ध विकल्पित होतो. म्हणजे केले तर चांगले. नाही केले तर दोष नाही असे सिद्ध होतो.

आता दुसरा श्लोकाचा अर्थ विचार करू.

भरण्यामकृतं यस्य श्राद्धं चापरपाक्षिकम् ।
प्रेतत्वान्नैव मुक्तिःस्याद्भूतैः श्राद्धशतैरपि ॥

या श्लोकात "भरणीश्राद्ध नाही केले तर किती श्राद्ध केले तरी त्याचे प्रेतत्व जाणार नाही" असे सांगीतले तर गयाश्राद्ध प्रत्यक्षाने नाही केले तरी त्याच्या पेक्षा भरणीश्राद्धच मुख्य असल्याने भरणीश्राद्धाने गयाश्राद्ध अन्तर्गत होईल अशी आपत्ति येते. त्यामुळे भरणीश्राद्ध प्रशस्त असून नित्य होत नाही.

दर्शश्राद्धं गयाश्राद्धं श्राद्धं चापरपक्षकम् ।
प्रथमेऽब्देपि कुर्वीत सपिण्डीकरणे कृते ॥
नित्यनैमित्तिकश्राद्धं तीर्थश्राद्धादिकं च यत् ।
सपिण्डीकरणादूर्ध्वं पुत्रः कुर्याद्यथाविधि ॥

या स्मार्तपद्धति विवेचनिका ग्रन्थातील "स्मृतिसंग्रह" वाक्या प्रमाणे द्वादशाही सपिंडन केल्यानंतर दर्श, महालय, गया, तीर्थ, नित्य, नैमित्तिक, ही सगळी श्राद्धे करता येतील असे सिद्ध आहे. पण "श्राद्धशतैरपि" या वचनाने जे अवर्जनीयत्व सांगितले आहे ते अर्थवादच ~~अस~~ आहे असे सिद्ध होतो.

"प्रणम्य शिरसा देवं" या गणपतिस्तोत्रामध्ये सहा महिने पर्यंत या स्तोत्रपाठाने मुमुक्षूंना मुक्ति मिळेल असे आहे. तर श्रवण, मनन, निदिध्यासन, वेदांतचिंतन, संन्यासधर्मपालन हे व्यर्थ होवून जातील. त्यामुळे तसे गणपतिस्तोत्र प्रशस्त आहे ~~अस~~ रोज म्हटले पाहिजे असाच अर्थ अभिप्रेत आहे. तसे भरणीश्राद्ध सुद्धा प्रशस्त आहे. केले तर उत्तम फल मिळणार, नाही केले तर दोष नाही.

धर्मसिन्धूत "वर्षानंतर पितृत्व प्राप्ति होत असल्याने प्रथम वर्षी भरणीश्राद्ध करता येत नाही" हे वाक्य वर्षान्तसपिंडन पक्ष धरून असल्याने द्वादशाहसपिंडन पक्षात प्रथमवर्षी सुद्धा गयाश्राद्धफलकामनाने करता येईल. सोडले तर दोष नाही असे सिद्ध होतो.

शकः १९४२ भा.शु. १२
रवौ – ता.दि. ३०-८-२०

राजेश्वरशास्त्री
श्री.ज.शां.सं पाठशाला धारवाड